REGISTERED No. B. 3434

# अर्थ

अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वर्गणीचे दर :

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ४ आ.

जाहिरातीचे दर :

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:-

"अर्थ"

"दुर्गाधिवास" पुणें ४.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २७ एप्रिल, १९४९ | अंक १७

## मर्यादित रकमेच्या ठेवी घेणें आहेत.

# नानूज ब्रास वर्क्स लि.

( १९१३ सालच्या ७ व्या इंडियन कंपनी ॲक्टान्वयें नोंदलेली )

अधिकृत भांडवल .... .... रुपये २५,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवल .... रुपये ५ ००,०००

खपलेलें भांडवल .... .... रुपये २,५०,०००

हा कारखाना सुमारें ४० वर्षांच्या इतका जुना असून १९३० पासून मुख्यतः वैद्यकीय उपकरणें तयार करीत आहे. १९४५ मे मध्यें त्याचें रूपांतर करण्यांत येऊन एका जर्मन तज्ज्ञाकडून त्यांत पुष्कळ सुधारणा करण्यांत आली. या कारखान्याचें चालू उत्पादन दरमहा रु. १० ते १५ हजारांपर्यंत होतें. कंपनीचे सध्यांचे चालक श्री. कर्णिक यांनीं १९४८ च्या सुरुवातीला हा कारखाना विकत घेतला व त्याचें लिमिटेड कंपनींत रूपांतर होत आहे. कारखान्याचें उत्पादन सुमारें २५ ते ३० हजारांपर्यंत वाढवावें या हेतूनें कारखाना शिवरी येथें नेण्यांत आला असून तेथें मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू झालेलें आहे व त्यासाठी जरूर तें विजेचें कनेक्शनही मिळालें आहे.

ऑपरेशन टेबल्स, हॉस्पिटल्सना लागणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या कॉटस्, फ्रॅक्चर बेड्स्, फाउलर बेड्स्, स्टलराइझर्स इत्यादि उपकरणें तयार होत असून इलेक्ट्रोप्लेटिंग खातें, ब्रास व आयर्न फाऊंडरी इत्यादि नवीं खातीं चालू होत आहेत. कारखान्याचें नांव मोठमोठाली हॉस्पिटल्स, सरकारी खातें व रेल्वे यांच्या यादीवर असून कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाला चांगलीच मागणी आहे. विशेष माहिती आस्थापूर्वक पाठविली जाईल.

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

( १ ) सर माधवराव देशपांडे, के. बी. ई, अध्यक्ष.
डायरेक्टर-श्राफ ऑईल मिल्स लि. मुंबई.
सी. पी. बेरार मॉ. को बँक लि. इ.

( २ ) रावबहादूर जी. जी शेंबेकर,
डायरेक्टर-किर्लोस्कर ब्रदर्स लि., ओगले ग्लास वर्क्स लि. इ.

( ३ ) शेठ वल्लभजी हीरजी पोपट,
व्यापारी, न्यू चिंचबंदर रोड, मुंबई.

( ४ ) रावबहादूर नारायणराव सोपानराव बोरावके,
डायरेक्टर-सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.

( ५ ) शेठ चरणदास मरीवाला,
डायरेक्टर-नॅशनल गॅरेज लि. मुंबई,
बॉम्बे ऑईल इण्डस्ट्रीज लि. इ.

( ६ ) श्रीमंत ले. कर्नल राजे प्रतापसिंहराव भोसले,
एम. एल. ए. ( सी. पी. )
मेंबर-एक्झिक्युटिव्ह कौन्सिल, नागपूर युनिव्हर्सिटी.
ट्रस्टी, नागपूर इंप्रुव्हमेंट ट्रस्ट.

( ७ ) मुल्ला अब्दुल्लाभाई मुल्ला तेहेरअली,
एम. एल. ए. ( सी. पी. )

( ८ ) मारुतीराव विठ्ठलराव केदारी,
लँडलॉर्ड व व्यापारी, पुणें.

( ९ ) एम. व्ही. पोतनीस, व्यापारी, मुंबई.

( १० ) डी. एस. भावे, व्यापारी.
भागीदार-डी. एस. भावे अँड ब्रदर्स, पुणें २.

( ११ ) के. जी. कर्णिक, व्यापारी
डायरेक्टर-सर्व्हाल लि. दिल्ली इ.

( १२ ) ग. रा. साठे, मॅनेजिंग एजंट
साठे बिस्किट अँड चॉकोलेट वर्क्स लि.,
चेअरमन, प्रेसिडेन्सी इं. बँक लि., इ.

मॅनेजिंग एजंटस्—
मे. कर्णिक अँड भावे
लिमिटेड

—बँकर्स—
दि बँक ऑफ इंडिया लि. मुंबई
दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मुंबई
दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. मुंबई

ऑडिटर्स—
मे. जी. एम्. ओक अँड कं.
पुणें व मुंबई

ठेवींवरील व्याजाचे दर—१ वर्ष : ४ टक्के; २ वर्षे : ५ टक्के; ३ वर्षे : ६ टक्के
व्याजाची रक्कम दर महामाहीस दिली जाईल. जास्त माहितीकरितां लिहा.

—रजिस्टर्ड ऑफिस—
मापला महाल, ३१९ अ, गिरगांव रोड,
ठाकुरद्वार, मुंबई ४.

—ऑथराइज्ड ब्रोकर्स—
ए. एम. साठे, बी. एससी.,
'उल्हास' जंगलीमहाराज रोड, पुणें ४.

## सर्व प्रसिद्ध माल

ओगले यांचे प्रभाकर कंदील, स्टोव्हज, एनॅमलच्या थाळ्या वगैरे भांडीं, स्टेनलेस स्टीलचीं एव्हरसिल्व्हर भांडीं.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**पोलादाच्या किंमतींत वाढ**—हिंदुस्थान सरकारनें देशांत उत्पन्न होणाऱ्या पोलादाची किंमत दर टनामागें सरासरी १८ रुपये वाढविण्याचें ठरविलें आहे. ह्या वाढलेल्या किंमती १ मे, १९४९ पासून अंमलांत यावयाच्या आहेत. किंमतींतील वाढ टारिफ बोर्डानें ह्या बाबतींत केलेल्या सूचनांचा विचार करूनच करण्यांत आली आहे.

**बसच्या तिकिटांवर बक्षिसें मिळणार**—सरकारच्या मालकीच्या मोटारवहातूक बसमधून प्रवास करणाऱ्या नागरिकांनीं तिकिटें काढूनच प्रवास करावा म्हणून मद्रास सरकार तिकिटांत कांहीं नंबर बक्षिसाचे म्हणून ठेवणार आहे असें समजतें. त्यासाठीं दरमहिना १,५०० रुपये बाजूला काढून ठेवण्यांत येणार आहेत. ह्या योजनेचा तपशील तयार होत असून मद्रास शहराच्या वहातुक सल्लागार मंडळानें मान्यता दिल्यावर ती अंमलांत आणली जाईल.

**बादशाही इमारतींना बंदी**—मुंबई सरकारच्या प्रसिद्धी खात्यातर्फे काढण्यांत आलेल्या एका पत्रकाप्रमाणें नाट्यगृहें, सिनेमागृहें, मोठमोठ्या बादशाही थाटाच्या इमारती, इत्यादि प्रकारच्या नव्या कामांना बंदी करण्यांत आली आहे. सध्याची रहात्या घरांची टंचाई लक्षांत घेऊन कमी प्राप्ती असणाऱ्या लोकांना रहाण्यास सोयीचीं अशीं घरें किंवा शाळा, कॉलेजें, वसतिगृहें, इस्पितळें, अशा इमारती बांधण्यास परवानगीचा अग्रहक्क देण्यांत येणार आहे.

**श्री. बिर्ला ह्यांचें परदेशगमन**—सुप्रसिद्ध हिंदी उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला हे इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, इत्यादि देशांतील एंजिनिअरिंग व इतर धंद्यांतील आधुनिक सुधारणांचें निरीक्षण करण्यासाठी तीन-चार महिन्यांचा दौरा काढणार आहेत. आपल्या दौऱ्यांत मिळविलेली माहिती ते हिंदुस्थान सरकारलाहि पुरविणार आहेत.

**शंभर वेळा पेटूं शकणारी आगकाडी**—युगोस्लाव्हिआंतील एका संशोधकानें १०० वेळा पेटूं शकणाऱ्या आगकाडीचा शोध लावला असल्याचें वृत्त आहे. १ मेपासून ह्या नवीन प्रकारच्या आगपेट्या युगोस्लाव्हिआंत विक्रीला ठेवण्यांत येणार आहेत. आगपेटींतील काड्यांच्या टोकांना एक नवीन प्रकारचें रसायन लावलें आहे. काड्या चार इंच लांब असून सध्यांच्या काड्यांपेक्षां जरा जास्त जाड आहेत.

**श्री. पी. व्ही. आगाशे**—मुंबईच्या दि संडे स्टँडर्ड ह्या साप्ताहिकानें कॉसवर्ड कोड्यांची योजना सुरू केली आहे. त्याच्या पाच परीक्षकांत बँक ऑफ महाराष्ट्र लि., मुंबईचे एजंट श्री. पी. व्ही. आगाशे, एम. ए., हे एक आहेत.

**रेल्वे स्टेशनावरील उर्दू पाट्या**—जी. आय. पी. रेल्वेच्या स्टेशनावरून असणाऱ्या स्टेशनाच्या नांवाच्या उर्दू पाट्या ह्यापुढें काढून टाकण्यांत येणार आहेत असें समजतें. ह्या रेल्वेच्या स्टेशनावरील पाट्या मुख्यतः इंग्लिशमध्यें, त्या त्या प्रांतिक भाषांतून आणि उर्दूतून लिहिण्याची वहिवाट आजपर्यंत चालू होती. सर्व हिंदुस्थानांतील रेल्वेवरही उर्दू लिपीऐवजीं देवनागरी लिपी वापरण्याच्या प्रश्नाचा विचार सध्या चालू आहे.

**इटलींतील जमीन-धारणेंत सुधारणा**—इटलींत जमीनदारांच्या जमिनी वाटून ३० लाख नवे जमिनीचे मालक उत्पन्न करण्याचा कार्यक्रम तेथील सरकार अंमलांत आणणार आहे. शेतमजूर, छोटे शेतकरी आणि पिकांत भागी घेऊन जमीन करणारे, ह्यांना उत्पादनांत उत्साह वाटावा म्हणून ही सुधारणा करण्यांत येत आहे. ह्या सुधारणेमुळें मोठ्या जमीनदारांना आपल्या जमिनींपैकी २० ते ५० टक्के जमीन सोडून द्यावी लागणार आहे. मोठ्या जमीनदारांकडे २५० ते ६५० एकरपर्यंत जमीन सुधारणा झाल्यावरहि राहणार आहे.

**कोयना नदीवरील धरण**—कोयना नदीवर बांधावयाच्या धरणासंबंधीं मुंबई सरकारनें प्राथमिक पहाणी सुरू करावी असा निर्णय मध्यवर्ती सरकारनें घेतला आहे. मुंबईच्या दक्षिणेला कोयना नदीवर २०० फूट उंचीचें धरण बांधण्याची ही योजना आहे. ह्या पाण्याच्या सांठ्यापासून ३ लाख किलोवॅटस वीज उत्पन्न करता येईल, त्यासाठी ३० कोटी रुपये खर्च येईल.

**गांधी-फंडाला देणगी**—इंपीरिअल बँकेच्या भागीदारांची खास सभा नुकतीच झाली. सभेंत गांधी-स्मारक फंडाला ६,१५,००० रुपये देणगी देण्याचा ठराव मंजूर करण्यांत आला.

**वनस्पति तुपाविरुद्ध इषारा**—अलाहाबाद विद्यापीठाचे प्रो. भट्टाचार्य ह्यांनीं एक पत्रक काढून वनस्पति-तूप राष्ट्रीय आरोग्याला विघातक असल्यामुळें सरकारनें त्याच्या निर्मितीला बंदी करावी असें सुचविलें आहे.

**जमीन विषयक प्रयोगशाळा**—संयुक्त-प्रांतांतील शेतीच्या व्यवसायांत सुधारणा करण्यासाठीं सरकारनें अलीगड येथें एक शेत-जमीन-विषयक प्रयोगशाळा काढण्याचें ठरविलें आहे. प्रयोगशाळा आधुनिक उपकरणांनीं सुसज्ज असून जमिनींचें पृथक्करण, खतें आणि जमिनींतील पिकांची शास्त्रीय अदलाबदल इत्यादि विषयांचा अभ्यास प्रयोगशाळेंत करण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानांत शिशाच्या खाणी**—पाकिस्तानांत सामील झालेल्या एका संस्थानांत शिशाच्या खाणी सांपडल्या आहेत. ह्या संस्थानाची भूगर्भविषयक पहाणी आतां करण्यांत येत आहे, असें समजतें.

**स्विस तज्ज्ञांची मदत**—हिंदुस्थानांत रेल्वेचे डबे बांधण्याचा कारखाना काढण्यासाठीं कांहीं स्विस तज्ज्ञांची मदत घेण्यांत येणार आहे, असें समजतें. युद्धकालांत जे रेल्वेचे मार्ग बंद करण्यांत आले होते ते आय व्ययाच्या दृष्टीनें स्वयंपूर्ण होत असल्यास परत चालू करण्याचा सरकारचा विचार आहे, असें समजतें.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

# अर्थ

बुधवार, ता. २७ एप्रिल १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## किर्लोस्कर ऑइल एंजिन्सचें स्वागत

ऑईल एंजिनें तयार करण्यासाठी सुमारें पावणेतीन वर्षापूर्वी "किर्लोस्करां"नीं किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि. ही कंपनी स्थापन केली. तिनें विक्रीस काढलेलें सर्व भांडवल तात्काळ खपूनहि, जागा हातीं येण्याच्या व इतर अडचणींमुळें कारखान्याच्या व यंत्रसामुग्रीच्या उभारणीचे कामास अपेक्षेपेक्षां थोडा उशीर झाला. तथापि, शक्य त्या कार्यक्षमतेनें व तत्परतेनें उभारणीचें काम पुरें करण्यांत येऊन कारखान्याचें उद्घाटन सोमवार ता. २५ रोजीं हिंदचे उद्योगमंत्री डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी ह्यांच्या हस्तें खडकी येथें मोठ्या समारंभानें झालें आणि एंजिनांच्या विक्रीसहि त्याचवेळीं प्रारंभ करण्यांत आला. अशा रीतिनें मोठ्या प्रमाणावर स्वदेशी ऑईल एंजिनें तयार करण्याच्या कामीं "किर्लोस्करां"च्या ह्या महाराष्ट्रीय कंपनीनें आघाडी मारून आणखी एका राष्ट्रोपकारी धंद्यास प्रत्यक्ष सुरवात केली आहे. ह्या निमित्तानें चालकांचें आम्ही अभिनंदन करून त्यांच्या ह्या उपक्रमास सुयश चिंततों.

इंटर्नल कंबश्चन एंजिनें, म्हणजेच सामान्यपणें ओळखलीं जाणारीं ऑईल एंजिनें, आतां हिंदुस्थानांत सर्वत्र वापरलीं जात आहेत. हिंदच्या औद्योगीकरणाबरोबर ऑइल एंजिनांस असलेली मागणीहि अनेक पटींनीं वाढेल ह्यांत संशय नाहीं. त्याचप्रमाणें शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सहकारी पद्धतीनें शेती धंदा म्हणून करावी लागेल त्यामुळेंहि ऑईल एंजिनांना एकसारखी मागणी येत राहील. अमेरिकेंतील शेतींपैकीं दोन तृतीयांश शेतांतील कामें विजेच्या सहाय्यानें करण्यांत येतात आणि लवकरच तीन चतुर्थांश शेतांस तेथें वीज मिळूं लागेल, असा अंदाज आहे. १४ वर्षांपूर्वी, तेथील फक्त ११% शेतांवर वीज वापरली जात होती. हिंदी शेतीचें उत्पादन वाढवून, आपल्या देशाची उपासमारींतून व परदेशांच्या सावकारी मगरमिठींतून सत्वर, ह्याचप्रमाणें कायमची मुक्तता व्हावयाची असेल तर आपणांसहि तुकडेबंदी करून, यांत्रिक सहाय्यानें पिकें काढलीं पाहिजेत. विजेची शक्ति खेडो-खेडीं पोंचविण्याचें सरकारचें ध्येय केव्हां साध्य होईल तें होवो; कितीतरी दीर्घ काळ आपणांस ऑइल एंजिनांवर अवलंबून रहावें लागेल व त्याची तयारी "किर्लोस्करां"नीं वेळींच करून ठेवली आहे. स्वदेशी एंजिनांमुळें सर्व प्रकारचें स्वदेशी उत्पादनच केवळ वाढणार नसून, परदेशी हुंडणावळीचीहि मोठी बचत होणार आहे. सरकारच्या सध्यांच्या परराष्ट्रीय घेण्या-देण्याच्या प्रतिकूल परिस्थितींत, "किर्लोस्करां"ची ही राष्ट्रीय कामगिरीहि कमी महत्त्वाची नाहीं.

स्वदेशी एंजिनें तयार करण्याच्या प्रस्तुत उपक्रमांत, तीं परदेशी एंजिनांच्या केवळ तोडीचींच नव्हे तर त्यांपेक्षा चांगलीं व्हावीत, अशी दक्षता बाळगण्यांत आली आहे. ब्रिटिश ऑइल एंजिन्स ( एक्सपोर्ट ) लि. ह्या सुप्रसिद्ध कंपनीचें सर्व प्रकारचें सहाय्य किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि. ला मिळालें आहे व मिळणार आहे. लायसेन्सेस, डिझाइन्स, पॅटर्न्स, जिग्स, फिक्श्चर्स, तांत्रिक माहिती, इत्यादी पुरतेंच हें सहकार्य मर्यादित नसून ब्रिटिश कंपनीनें आणखीहि मदत देऊं केली आहे. किर्लोस्कर कारखान्यांतील इंजिनिअरांची ब्रिटिश कंपनीच्या कारखान्यांत शिक्षणाची सोय करणें, तिचे तज्ज्ञ सल्ल्यासाठी पाठविणें, एंजिनांच्या उत्पादनाला लागणारी हरतऱ्हेची माहिती पुरविणें, इत्यादि गोष्टीहि ह्या सहकार्यांत समाविष्ट आहेत. ५ ते ३०० बी. एच. पी. शक्तीचीं एंजिनें किर्लोस्कर कारखान्यांत तयार होणार आहेत, त्यांपैकी कमी शक्तीचीं एंजिनें प्रारंभीं हातीं घेण्यांत आलीं आहेत.

हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी परदेशीयांचें सहकार्य घेण्याच्या कल्पनेस ज्यावेळीं विरोध होता, अशा वेळीं "किर्लोस्करां"नीं दूरदृष्टीनें ब्रिटिश कारखानदारांचें सहकार्य मिळवून वेळींच कारखान्याच्या उभारणीचें काम सुरू केलें, त्याचें फळ आतां मिळूं लागलें आहे. आपला माल अत्युत्कृष्ट दर्जाचा राहील व तो शक्य त्या कार्यक्षमतेनें तयार केला जाईल, ह्याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं, असें चालकांनीं जाहीर केलें आहे. तेव्हां ऑईल एंजिनें वापरूं इच्छिणारांनीं किर्लोस्कर ऑईल एंजिन्सचीच मागणी करण्याचें कर्तव्य, अभिमानपूर्वक पार पाडलें पाहिजे आणि सरकारनेंहि ह्या उपक्रमाकडे आपुलकीनें सतत लक्ष ठेवून, त्याच्या भरभराटीस प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत केली पाहिजे. किर्लोस्कर सन्स आणि कं. च्या वतीनें श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांनीं प्रस्तुत कारखान्याचे उभारणीबाबत केलेल्या परिश्रमांचा येथें उल्लेख करणें उचित होईल. त्यांच्या कार्यक्षम देखरेखीखाली तयार होणाऱ्या ऑईल एंजिनांच्या सहाय्यानें देशाच्या आर्थिक उन्नतीस भरीव हातभार लागणार आहे.

---

### पौंडाच्या चलनी नोटेवर नंबर नाहीं!

बँक ऑफ इंग्लंडच्या चलनी नोटांवर वरच्या उजव्या कोपऱ्यांत नंबर छापलेला असतो. लंडन येथील एका माणसाच्या हातीं नुकतीच एक पौंडी नोट आली, तिचेवर नंबर नव्हता! तपासणी केली असतां, ती नोट बनावट नसल्याचें सिद्ध झालें. नोटा प्रसृत करण्यापूर्वी त्यांची कसून तपासणी केली जाते, परंतु तिचेंतून ही नोट कशी निसटली, हें कोणासच सांगता आलें नाहीं.

### लोकसंख्येची वाढ

• उत्पादन करणाऱ्या तरुणांच्या मानानें खाणाऱ्या वयस्क लोकांची संख्या झपाट्यानें वाढत आहे. गेल्या ४० वर्षांत जगाची लोकसंख्या दुप्पट झाली. क्षय, इत्यादि रोगांचा प्रतिबंध झाल्यामुळें साठीस पोचणारे लोक अधिकाधिक आढळतात.

### टॅक्सीमध्यें रेडिओवादनास बंदी

न्यूयॉर्क शहरांतील टॅक्सींमधील रेडिओ काढून टाकण्याची सक्ती करण्यांत आली आहे. ह्या रेडिओवरील कार्यक्रमामुळें ड्रायव्हरचें लक्ष रस्त्यावर खिळून रहात नाहीं व अपघात जास्त होतात असें आढळून आलें, त्यामुळें रेडिओवर ही बंदी घालावी लागली.

### मराठा चेंबरमधील समारंभ

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजच्या मुख्य इमारतीचें, आणि तिचेमधील ओगले स्मारक हॉलचें उद्घाटन आणि चेंबरच्या इमारतीशेजारील पटांगणाचें "स्वस्तिक पटांगण" असें नामकरण, ह्यांचे समारंभ हिंदुस्थान सरकारचे उद्योग मंत्री, डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी, ह्यांच्या हस्तें ता. २४ रोजीं मोठ्या समारंभानें झाले. चेंबरच्या निवेदनास उत्तर देतांना उद्योग मंत्र्यांनीं सध्यांच्या बिकट औद्योगिक व उत्पादन परिस्थितीचें उत्कृष्ट पृथःकरण केलें, सरकारच्या प्रयत्नांची माहिती सांगितली व कारखानदारांच्या हार्दिक सहकार्याची मागणी केली. मोठ्या कारखान्यांबरोबर मध्यम आकाराच्या संघटित उद्योगधंद्यांसहि स्थान आहे व त्या दृष्टीनें महाराष्ट्राकरितां एकादि व्यापक संघटित योजना आखण्यांत आली तर तिचें सरकार स्वागत करून सहाय करील, असें त्यांनीं जाहीर केलें.

### रसायन मंदिर योजना प्रारंभ

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रा. द. बा. लिमये ह्यांनीं स्थापन केलेल्या रसायन मंदिराच्या योजनेचा प्रारंभ ना. न. वि. गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं व हस्तें ता. २३ रोजीं झाला. प्रा. लिमये ह्यांच्या रसायन विषय संशोधनाच्या महत्त्वास जागतिक मान्यता मिळालेली असून, तेंच कार्य रसायन मंदिरामार्फत चालू ठेवण्यासाठी रसायन मंदिराची योजना आहे. १ लक्ष रुपयांवर देणग्या आजवर मिळाल्या आहेत. रासायनिक संशोधनाच्या कार्याचें महत्त्व व प्रा. लिमये ह्यांचा त्याबाबत अधिकार हीं सुप्रसिद्धच आहेत. आणखी १० लक्ष रुपयांची आवश्यकता असली तरी त्यासाठी अडून न रहातां संशोधन कार्य कर्तव्यनिष्ठेनें चालू रहाणार आहे.

### गिरणी कामगारांना ४½ महिन्यांचा बोनस

मुंबई गिरणी कामगारांना १९४८ सालाकरितां त्यांच्या ४½ महिन्यांच्या मूळ पगारा इतका बोनस देण्यांत यावा, असा निर्णय मुंबई इंडस्ट्रिअल कोर्टानें जाहीर केला आहे. बोनसचा हिशेब करतांना महागाई भत्ता इ. विचारांत घेण्यांत येणार नाहीं. ज्या कामगारांनीं २० दिवसांपेक्षा कमी दिवस काम केलें, किंवा ज्यांना गैरवर्तणुकीबद्दल कामावरून काढण्यांत आलें, अशा कामगारांना बोनस मिळणार नाहीं. ज्यांनीं ६३ दिवसांपेक्षा कमी दिवस काम केलें, त्यांना त्यांच्या वर्षातील कमाईच्या ५०% बोनस मिळेल. बोनसची रक्कम ३१ मे व ३० जून ह्या दिवशीं दिली जावयाची आहे.

### श्री. दा. वा. पोतदार

मुंबई सरकारनें बोर्ड ऑफ टेक्निकल ॲंड इंडस्ट्रिअल बोर्डाची पुनर्घटना केली आहे. मराठा चेंबरचे कार्याध्यक्ष, श्री. दा. वा. पोतदार, बी. ई. (इले.), बी. ई. (मेकॅ.) ह्यांची बोर्डावर नेमणूक झाली आहे.

### संरक्षक धोरणाची तपासणी : कृष्णम्माचारी कमिटी

हिंदुस्थानांत १९२२ सालापासून उद्योगधंद्यांचें संरक्षक धोरण अंमलांत आहे. त्या धोरणाची तपासणी करून शिफारसी करण्याचें काम सर व्ही. टी. कृष्णम्माचारी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमून तिच्याकडे सरकारनें सोपविलें आहे. कमिटीच्या कार्याचें स्वरूप संरक्षण धोरणापुरतें मर्यादित असलें तरी तिला व्यापक आर्थिक प्रश्नांकडेहि लक्ष पुरवावें लागेल, हें उघड आहे.

### जर्मन कटलरीची स्पर्धा

जर्मनीमधून कपवशांची निर्गत सुरू झाल्यामुळें ब्रिटिश कारखानदारांना त्याची स्पर्धा जाणवूं लागली आहे. शेफील्ड चेंबर ऑफ कॉमर्सनें ब्रिटिश सरकारकडे तक्रार नोंदविली आहे.

### सोलापूर डि. सें. को. बँकेंत महात्मा गांधींचें तैलचित्र

सोलापूर डि. सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत महात्मा गांधींच्या पूर्ण आकाराच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ ता. २५ रोजीं नामदार गाडगीळ ह्यांच्या हस्तें झाला.

### पेनिसिलिनचा कारखाना

पेनिसिलिनचें उत्पादन करणारा कारखाना देहू रोड येथें उभारण्यांत यावयाचा आहे. ह्या योजनेस ३ कोटी रु. खर्च येईल.

**सिंधमधील विजेचे कारखाने**—सिंध सरकारनें प्रांतांतील विजेच्या कारखान्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविलें आहे. फाळणी होण्यापूर्वी सिंधमध्यें २० वीज निर्मितीचीं केंद्रें होतीं. त्यांपैकीं तीन केंद्रांचें राष्ट्रीयीकरण पूर्वीच करण्यांत आलें असून आतां आणखी सहा कारखाने सरकार चालविण्यास घेणार आहे.

**कापडाच्या व सुताच्या किंमती**—टॅरीफ बोर्डानें सुचविल्याप्रमाणें कापडाच्या व सुताच्या किंमती ठरवितांना ह्यापुढें सरकार फक्त मागील एकाच महिन्यांतील कापसाची सरासरी किंमत लक्षांत न घेतां, मागील तीन महिन्यांतील कापसाच्या किंमतींची सरासरी लक्षांत घेईल, असें समजतें. टॅरीफ बोर्डानें किंमती ठरवितांना ज्या बाबींचा विचार केला होता त्यांपैकीं फक्त कापसाच्या किंमती कमी-अधिक झालेल्या आढळून आल्या. त्यामुळें वरील निर्णय घेण्यांत आला आहे, असें कळतें.

**मद्रासमधील वृत्तपत्रांच्या विक्रीवरील कर**—मद्रास प्रांतांतील वृत्तपत्रांकडून दर रुपयामागें ३ पै ह्याप्रमाणें विक्रीकर घेण्यांत येत असे. आतां वृत्तपत्रांतील जाहिरातींवर १० टक्के कर घेण्याचें सरकारनें ठरविलें असल्यामुळें विक्रीकर रद्द होण्याची शक्यता आहे. जाहिरातींवरील कराचें अखेरचें स्वरूप निश्चित होईपर्यंत सरकार ह्या दोन्ही करांचा विचार करणार आहे. तथापि विक्रीकर आणि जाहिरातकर दोन्हीहि रद्द होण्याचा संभव मात्र नाहीं, असा खुलासा करण्यांत आला आहे.


## कूळ व शेत-जमीन कायदा

१९३८

प्रसिद्ध झाला. साधी बांधणी किं. ४ रु.; उत्तम कागद व बांधणी ५ रु; कूळकायदा (१९३९) तिसरी आवृत्ति किं. ३ रु.; मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु.; शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४ व ४॥ रु.; घरभाडें नियंत्रण कायदा किं. २ रु.; द्विभार्याप्रतिबंधक कायदा दुसरी आवृत्ति, किं. १ रु.; हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु.

नवीन कूळ कायद्याप्रमाणेंच्या खंडाच्या पावत्या. २५ पावत्यांच्या पुस्तकास ८ आणे.

पत्ता— लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.

## महाराष्ट्र कृतिवंत झाल्याविना दुर्दशा थांबणार नाहीं

—x—

### विधायक कार्याची चटक कशी लागेल ?

( श्री. शं. वा. किर्लोस्कर )

आज घसरत चाललेलें महाराष्ट्राचें गाडें रुळावर आणण्यास एकाद्या "इझम" चा पाठपुरवा करण्यापेक्षां, युक्तायुक्त विचार करून आपल्यास स्वतःचे स्वतंत्र व्यवहारिक मार्ग चोखाळावे लागतील. आज पॅलेस्टाइनसारख्या देशांतील मूठभर इस्राएल त्या ओसाड प्रांताचें नंदनवन बनवीत आहेत व अशाच तऱ्हेचे राष्ट्रीय पुनरुत्थानाचे प्रयोग जगाच्या पाठीवर चालले आहेत. त्यांच्यापासूनहि जितकें शिकतां येईल तितकें शिकावें लागेल. एवढेंच नव्हे, तर देशकालवर्तमान यांचा विचार न करतां आपण एकादी चळवळ सुरू केल्यास तिच्यापासून फायदा होण्याऐवजीं उलट पश्चात्ताप करण्याचीच पाळी येते हें आपण लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. आपल्या अनुभवांतील एक प्रत्यक्ष उदाहरणच येथें दिलेलें बरें.

महाराष्ट्रांत इतर खनिज साधनसंपत्ति विशेष नसली, तरी सह्याद्रीमुळें मुबलक वीज व शेतीला कालव्यांचें पाणी मिळण्याची उत्कृष्ट सोय आपल्या हाताशीं आहे. या सोयीचा लाभ करून घेण्यासाठी टाटा कंपनीनें पूर्वी तज्ज्ञांकडून सह्याद्रीची पहाणी केली व योग्य जागीं धरणें बांधण्याची योजना आंखली. तथापि दुर्दैव असें कीं धरणामुळें साऱ्या महाराष्ट्राचा औद्योगिक व शेतीचा विकास किती अमर्याद होईल इकडे न पाहतां, कांहीं शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार एवढ्यासाठीच टाटांची मुळशी येथील धरण योजना हाणून पाडण्यास महाराष्ट्रांत जोराची चळवळ सुरू झाली. तिचा परिणाम इतकाच झाला कीं, हातीं घेतलेलें मुळशीचें धरण मोठ्या मुष्किलीनें पुरें केल्यावर हेळवाकजवळ कोयना नदीला धरण बांधण्याची महाराष्ट्राला जीवनाधार ठरणारी योजना टाटांनीं रद्द केली.

महाराष्ट्राच्या खऱ्या प्रगतीला खो घालणाऱ्या गोष्टी आपणच केल्यावर महाराष्ट्राच्या पिछेहाटीबद्दल तक्रार करायला आपणांला कुठें जागा रहाते ? याच्याच पुढची तऱ्हा म्हणजे परवां गांधीवधाचें निमित्त करून महाराष्ट्रांत समाजांतील एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर उगविलेला सूड ! या अत्याचारांत शेकडों घरें भस्मसात् करण्यांत आलीं, इतकेंच नव्हे तर सुमारें चाळीस कारखान्यांचाहि नाश करण्यांत आला. हे सर्व कारखाने महाराष्ट्रीयांचे, व नाश करणारेहि त्यांचेच भाईबंद ! यापुढें कांहीं वर्षें दक्षिणेंतील कारखान्यांना डोकें वर काढणें किती जड जाणार आहे याची कुणास कल्पना आहे का ?

टिळक-गोखल्यांनीं महाराष्ट्राला राजकारणांत अग्रेसर पद मिळवून दिलें, यांत शंका नाहीं. परंतु त्यांच्या राजकारणाला दोन आघाड्या असत. एकीकडे सरकारशीं झगडत असतां दुसऱ्या बाजूनें देशाची ढांसळलेली आर्थिक भिंत पुनः उभी करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असे. स्वदेशीची मोहीम ही या दृष्टीनें त्यांची केवढी तरी महनीय कामगिरी होय. महाराष्ट्राला तिच्यामुळें एक नवजीवन प्राप्त झालें. मात्र त्यांच्या पश्चात् गेल्या ३० वर्षांत राजकारण अत्यंत एकांगी बनून गेलें. त्यामुळें रचनात्मक कार्याचें खरें महत्त्व दृष्टिआड झालें. देश स्वयंपूर्ण व स्वावलंबी होण्यासाठी देशांत अनेक प्रकारचे व्यवसाय व औद्योगिक प्रयत्न सुरू झाले पाहिजेत. पण असे उद्योग हातीं घेणारांना व चालविणाऱ्यांना उत्तेजन मिळण्याऐवजी, पदोपदीं स्वकीयांकडूनच निकराचा विरोध होत गेला, तर महाराष्ट्र पुढें येणार कसा ?

महाराष्ट्र असो, किंवा देशांतील इतर कोणता प्रांत असो, साऱ्या जनतेपुढें आतां दोनच वाटा आहेत. प्रचलित सरकार कुचकामाचें आहे असें ठरवून त्याला उलटून टाकण्यासाठी सगळीकडे झगडा सुरू करायचा ही एक वाट. हा मार्ग सध्यांच्या स्थितींत केवळ अव्यवहार्यच नव्हे तर अत्यंत आत्मघातकीपणाचा ठरेल. दुसरा मार्ग सध्यांच्या सरकारचेंच आसन स्थिर करून व त्याच्याशीं पूर्ण सहकार्य करून निरनिराळ्या विधायक योजना बेताबेतानें अंमलांत आणायच्या आणि जनतेची स्थिति सुधारायची. हा मार्गच महाराष्ट्राला श्रेयस्कर ठरेल.

### वैचारिक स्थित्यंतराची आवश्यकता

मात्र हा मार्ग अनुसरण्यासाठी साऱ्या देशांत अगोदर एक प्रचंड वैचारिक स्थित्यंतर घडवून आणावें लागेल. दीर्घकाळ चालणारा व देशव्यापी कोणताहि उद्योग सुरळीतपणें चालविण्यांत देशांतील आबालवृद्धांना त्याबद्दल अगत्य वाटलें पाहिजे, अशा कार्यक्रमाचें सर्वांना आकर्षण वाटून त्याला जरूर तें सहकार्य देण्यास त्याला अभिमान वाटला पाहिजे. अशा कामांत कसलाहि बिघाड होणार नाहीं याबद्दल प्रत्येकानें खबरदारी घेतली पाहिजे. पण वस्तुस्थिति कशी आहे ? सध्यां कोणत्याहि विधायक कामाबद्दलची आस्था जनतेंत फार मंदावली आहे. उथळपणा व उच्छृंखल वृत्ति यांना मात्र सगळीकडे कसा ऊत आला आहे हें कुणाला दाखवायला नको. एवढें कुठें निमित्त झालें कीं, दंगल, हुल्लडबाजी व गुंडगिरी करायला जणूं लोक टपलेले असतात. त्यामुळें कोणतेंहि कार्य सुरळीतपणें चालविणें मुष्किलीचें होत चाललें आहे. विद्यार्थ्यांची साधी परीक्षा असली, तरी तें काम कसे निभावून नेईल याबद्दल विद्याधिकाऱ्यांना प्रश्न पडतो. मग रेल्वे, पोस्ट, नगरपालिका, छापखाने, कारखाने व हॉस्पिटल्स अशा ठिकाणच्या कामाबद्दल तर बोलायलाच नको !

महाराष्ट्राच्या पुनर्रचनेच्या कार्याला हात घालायचा, तर समाजांत पसरलेल्या या वैचारिक अराजकाचा व स्वैरशाहीचा अगोदर बंदोबस्त झाला पाहिजे. जनतेला एवढ्यासाठी योग्य मार्गदर्शन करून तिची सदसद्विवेक बुद्धि जागृत केली पाहिजे. कारण, जनतेचा पाठिंबा व तिचा उत्साह हेंच पुढील राष्ट्ररचनेच्या कार्यांतील मुख्य भांडवल आहे.

महाराष्ट्रांतील कारखानदार वर्ग सुबुद्ध व पुरोगामी विचारसरणीचा असल्यानें काळाबरोबर पावलें टाकण्यांत त्यांना अवघड वाटणार नाहीं. मला तर असें वाटतें कीं, जग दिवसेंदिवस किती संकुचित होत चाललें आहे व त्यांत किती झपाट्यानें बदल पडत चालला आहे, याची आपल्या कारखानदारांइतकी इतर क्षेत्रांतल्या व्यक्तींस क्वचितच कल्पना असेल. त्यामुळें कोणत्याहि सुधारणेला हटवादीपणानें ते प्रतिकार करणार नाहींत. तथापि जी क्रांति व्हावीशी वाटते ती एकाच फटकाऱ्यांत होऊं शकेल काय, हा प्रश्न आहे. नसल्यास ती कोणत्या टप्प्यानें घडवून आणण्यासारखी आहे हें पाहिलें पाहिजे. आणि टप्प्याटप्प्यानें वर चढावयाचें तर सध्यांच्या सरकारशीं वितुष्ट करायला नको. कारण तेंच या सरकारचेंहि धोरण आहे व त्याला अनुसरून कायद्यांत इष्ट बदल होत आहेत हें आपण पहातोंच.

एवढ्याचसाठी समाजवादाचा नुसता उदोउदो करून किंवा चालू गाड्याला खीळ घालून खरा समाजवाद प्रस्थापित होईल असें म्हणतां येणार नाहीं. समाजवाद हें एक तत्त्वज्ञान आहे, तो एक प्रकारचा धर्म आहे. आपल्या प्रत्येक व्यवहारांत व आचारांत

समाजाच्या अंतिम हिताकडे लक्ष देऊनच माणसानें वागावें, ही विचारसरणी श्रेष्ठ प्रतीची आहे. माणसांनीं आपल्या स्वार्थाचें वर्तुळ व्यक्तीपुरतें आकुंचित न ठेवतां समाजाचाहि त्यांत अंतर्भाव होईल एवढें तें विशाल करावें व तेवढ्यासाठीं त्याग करण्याची वेळ आली तर त्याला आनंदानें तयार असावें, ही समाजवादाची शिकवणूक आहे. माणसाची वृत्ति या प्रकारची असेल तरच त्यानें समाजवादाचें सरें ग्रहण केलें असें मानतां येईल.

पण आपण करीत असलेलें काम स्वतःचें अथवा मालकाचें नसून तें समाजाचें असतें याची दखलगिरी कुणालाच नाहीं. उलट कामांत पहिल्यापेक्षांहि अधिक हेळसांड व बेपर्वाई वाढत चाललेली. अशा अनिष्ट व विकृत वृत्तीनें पछाडलेल्या व्यक्ति समाजवादी राष्ट्राचा पाया होऊं शकतील काय?

### सार्वजनिक नैतिक अधःपतन

समाजांत पसरलेली विषमता दूर झाली पाहिजे याबद्दल दुमत नाहीं, परंतु त्या प्रयत्नांत व्यक्तिमात्रांतील कर्तव्यनिष्ठा, इमान, कळकळ, प्रामाणिकपणा, शिस्त इत्यादि गुणांना ओहोटी लागून सार्वजनिक नैतिक अधःपतन किती झपाट्यानें होत आहे इकडे दुर्लक्ष व्हावें हें मात्र योग्य नाहीं. कारण ठिसूळ विटांनीं बांधलेली भिंत फार उंच रचतां येत नाहीं, त्याचप्रमाणें मानसिक गुणांत हीन ठरणाऱ्या व्यक्तींनीं समाजाची उंची कशी वाढणार व त्यावर समाजवादाचा कळस तरी कसा चढणार?

एवढ्याचसाठीं महाराष्ट्राला आतां विधायक कार्याची चटक लावली पाहिजे. सर्वांचे हात व डोकें यांना भरपूर अवसर मिळूं शकेल असा प्रत्येकाला व्यवसाय उपलब्ध करून दिला पाहिजे. आपण नव महाराष्ट्राचे रचनाकार आहों ही जाणीव प्रत्येकांत जागृत झाली पाहिजे. मी महाराष्ट्रीय कोणी क्षुद्र प्राणी नव्हे; माझ्याकडे एक थोर कामगिरी आली असून ती पार पाडण्याची मला अपूर्व संधी मिळत आहे, या चैतन्यपूर्ण विचारांनीं प्रत्येकाला स्फुरण चढलें पाहिजे. साऱ्या महाराष्ट्राच्या उत्साहाचा व कर्तृत्वशक्तीचा कोंडून राहिलेला झरा असा खळखळ करीत जेव्हां बाहेर पडेल व जिकडे तिकडे हजारों प्रकारचीं विधायक कामें करण्यांत जनता रंगून जाईल, तेव्हांच अनेक क्षुद्र वैमनस्य व मतामतांतरांचा गलबला शांत होईल आणि सध्यां ज्या संशयाच्या व निराशेच्या भोवऱ्यांतून महाराष्ट्र सांपडला आहे त्यांतून तो बाहेर पडून उच्च जीवनाचा आस्वाद घेऊं लागेल.

मात्र सध्यांच्या गर्तेतून महाराष्ट्राला बाहेर काढण्याचें हें काम एकट्या दुकट्याचें नाहीं अथवा तें झटपट उरकतां येण्यासारखें नाहीं. तथापि प्रयत्नांची दिशा एकदां निश्चित झाली व महाराष्ट्रीय विचारवंत एकवटून खटपटीला लागतील तर महाराष्ट्राला "कृतिवंत" करण्यांत आपल्याला यश आल्यावांचून रहाणार नाहीं. कारण आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या एका थोर महाराष्ट्रीयानेंच एक महामंत्र आपल्यास ठेवला आहे, "केल्यानें होत आहे रे, आधीं केलेंच पाहिजे."

"मौज," ६-४-४९.

---

**ग्रंथपालांची अधिकृत यादी**—इंडिअन लायब्ररी असोसिएशन ही संस्था हिंदुस्थानांतील शिक्षित ग्रंथपालांची एक यादी तयार करीत आहे. ज्या ग्रंथालय-प्रमुखांनीं ह्या विषयाचें धंदेवाईक शिक्षण घेतलें असेल त्यांनीं आपलीं नांवें, सेक्रेटरी इंडिअन लायब्ररी असोसिएशन, युनिव्हर्सिटी लायब्ररी, दिल्ली २ ह्यांच्याकडे एप्रिल १९४९ अखेर कळवावयाचीं आहेत.

## मध्यवर्ती सरकारच्या कारभारांत सुधारणा

### काटकसर कमिटीची टीका व उपाययोजना

मध्यवर्ती सरकारच्या बिन-लष्करी खर्चांत युद्धकाळामध्यें झालेल्या वाढींची तपासणी करून, काटकसरीचे मार्ग सुचविण्यासाठीं हिंद सरकारनें गेल्या वर्षीचे आरंभीं एक काटकसर कमिटी नेमली होती. तिचा अधिकृत अहवाल अद्याप प्रसिद्ध झालेला नाहीं तथापि तिच्या शिफारसीविषयीं माहिती प्रसिद्ध झाली आहे, तिचेवरून मध्यवर्ती कारभारांत अपेक्षित काटकसर होऊं शकत नाहीं हें स्पष्ट झालें आहे. कमिटी वार्षिक २० कोटींची बचत दाखवूं शकेल अशी अपेक्षा होती; परंतु ५ कोटींपेक्षा अधिक काटकसर होऊं शकणार नाहीं असें आतां दिसूं लागलें आहे. युद्धापूर्वी मध्यवर्ती सरकारचा कारभार ८ मंत्री पहात असत; आतां १८ मंत्र्यांच्या कचेऱ्या निर्माण झाल्या आहेत. ही संख्या आवश्यक आहे किंवा नाहीं हा प्रश्न बाजूस ठेवला, तरी त्या कचेऱ्यांच्या कामाची संगति लावून कामाचा उठाव वाढविणें आवश्यक आहे.

ज्या परिस्थितींत ब्रिटिशांकडून आपणांस स्वातंत्र्य मिळालें, त्या परिस्थितीचा एक परिणाम म्हणजे सरकारच्या कारभारांत निर्माण झालेला खर्चिकपणा होय, असें मत कमिटीनें व्यक्त केलें आहे. पैसा पुरेल किंवा नाहीं, मनुष्यबळ उपलब्ध आहे का, मालाचा पुरवठा होईल का, इत्यादि गोष्टींचा नीट विचार न करतां सरकार दृष्टीला दिपवणाऱ्या योजना हातीं घेत आहे, अशी कमिटीनें टीका केली आहे; आणि मंत्र्यांच्या कचेऱ्यांचे कामांत योजनाबद्धता आढळत नाहीं अशी तिची तक्रार आहे. प्रांतिक जबाबदाऱ्यांच्या क्षेत्रांत मध्यवर्ती सरकार सुसूत्रतेच्या नांवाखालीं आक्रमण करीत आहे, त्यामुळेंहि खर्चांत वाढ झाली असल्याचें कमिटीस आढळून आलें आहे. लांचलुचपतीच्या प्रकारास आळा घालण्याचे कामीं सरकारास फारच थोडें यश आलें असल्याचें कमिटीनें नमूद केलें आहे. काटकसर कमिटीनें केलेली टीका व सुचविलेले अप्रिय परंतु पथ्यकारक उपाय लक्षांत घेऊन मध्यवर्ती सरकार सत्वर सुधारणा घडवून आणील, अशी अपेक्षा बाळगणें चुकीचें ठरेल काय?


**धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.**

कोपरगांव, जि. अहमदनगर.

( उद्घाटन समारंभ : ता. १७-१-१९४९ )

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापिन झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी.

**स्थानिक सहकारी बँक**

सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देणेंत येतें.

**विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा.**

| | |
|---|---|
| जी. पी. ठाणेकर बी. ए. मॅनेजर | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन. |

## किरकोळ बदल, म्हणजे रॅशनलायझेशन नव्हे.

### इंडस्ट्रिअल रिलेशन्स अ‍ॅक्टाखालील निवाडा

### विजय टेक्स्टाइल्स यशस्वी

"विजय टेक्स्टाइल्स लि. मध्यें साचेवाल्यांस प्रत्येकीं एका साच्यावर काम करावें लागत असे, परंतु कायद्यानें सांगितलेल्या नियमांचा अवलंब न करतां, मिल्सनें दोन साच्यांची पद्धति सुरू केली. ही गोष्ट बेकायदा ठरवून, एका साचाची पद्धत मिल्सला पूर्ववत् चालू करण्यास भाग पाडावें." असा अर्ज पुण्याच्या राष्ट्रीय गिरणी कामगार संघानें सोलापूरच्या लेबर कोर्टाकडे ( जज्ज: श्री. एम. के. त्रिलोकेकर, एम. ए., एलएल. बी. ) बॉंबे इंडस्ट्रिअल रिलेशन्स अ‍ॅक्ट ( कलम ७८ व ४६ ) खालीं केला.

विजय टेक्स्टाइल्सनें अशा रीतीनें बदल केल्याचें अमान्य केलें. "कांहीं साचे पडून होते; तेव्हां आम्हांला दोन साच्यांवर काम करण्यास परवानगी द्या म्हणजे आम्हांला जास्त मजुरी मिळूं शकेल अशी कांहीं कामगारांनीं मिल्सला विनंति केली. त्याप्रमाणें ज्यांनीं आपण होऊन मागणी केली त्यांनाच ही परवानगी देण्यांत आली. दोन साच्यांवर काम करण्याची कोणावरहि सक्ती नव्हती. ह्या योजनेमुळें कोणाहि कामगारास कामावरून जावें लागलें नाहीं." असें कंपनीनें म्हणणें मांडलें.

"अ‍ॅक्टांत सांगितलेल्या 'रॅशनलायझेशन' खालीं प्रस्तुत बदल येतो, असें अर्जदार युनियनचें म्हणणें होतें; तें बरोबर आहे काय आणि कंपनीनें बेकायदा बदल केला आहे काय, एवढाच प्रश्न कोर्टापुढें निवाड्यासाठीं आहे. ४० साच्यांपैकीं २२ साचे चालू होते आणि बाकीचे पडून होते. तेव्हां, कांहीं साचेवाल्यांच्या विनंतीस अनुसरून कंपनीनें त्यांना दोन साचे चालविण्याची परवानगी दिली, तर ती 'रॅशनलायझेशन'च्या सदरांत पडूं शकत नाहीं. तेव्हां, कंपनीनें बेकायदा बदल केलेला नाहीं. वादी आपल्या म्हणण्याचें समर्थन करूं शकला नाहीं. तेव्हां निवाडा वादींचे विरुद्ध देण्यांत येत आहे. विजय टेक्स्टाइल्सचें वर्तन बेकायदा झालेलें नाहीं." असा कोर्टानें निवाडा केला.

विजय टेक्स्टाइल्स लि. तर्फे तिचे मॅनेजिंग एजंट श्री. जी. डी. कवडीकर ह्यांनीं स्वतःच कंपनीतर्फे कोर्टांत काम चालविलें व त्यांत यश मिळविलें ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे.

### आंतरराष्ट्रीय चलननिधीचें कार्य

आंतरराष्ट्रीय चलननिधीचा मुख्य उद्देश, सदस्य राष्ट्रांना परराष्ट्रीय व्यापारांत येणारी तात्पुरती तूट किंवा इतर प्रासंगिक कारणामुळें निर्माण झालेल्या अडचणी दूर करणें हा आहे. गेल्या दोन वर्षांत आंतरराष्ट्रीय व्यापारांत पुष्कळ कठीण परिस्थितीचे प्रसंग निर्माण झाले. कारण निरनिराळ्या देशांची त्या त्या वर्षाची उत्पादन–परिस्थिति व पुनर्घटनेच्या कार्यासाठीं भांडवल व माल यांची आवश्यकता यामध्यें दिसून येणाऱ्या तफावतीमुळें जागतिक व्यापाराची म्हणजे पर्यायानें व्यापारी वजावट करण्याची परिस्थिति विकट होऊन निरनिराळ्या देशांना इतर देशांची देणीं फेडणें कठीण जाऊं लागलें. त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं आंतरराष्ट्रीय चलननिधींतून पैसे उसने घेण्यांत आले. निधीनें हें कार्य स्वतःच्या हातीं असणाऱ्या साधनसामुग्रीच्या दृष्टीनें व गरजू देशांच्या वर्गणीच्या परिस्थितीच्या दृष्टीनें पुरे पाडण्याचा प्रयत्न केला, व तो थोडाफार यशस्वीहि झाला. पुढेंमागें आंतरराष्ट्रीय व्यापाराची घडी जास्त पद्धतशीर रीतीनें स्थिर झाल्यावर निधीला हें कार्य अधिक कार्यक्षमतेनें करतां येईल. आंतरराष्ट्रीय व्यापारांत स्थिर संबंध राखण्याच्या दृष्टीनें निधीचें कार्य सध्यां चालू आहेच. यासाठीं निरनिराळ्या देशांचें चलन–विषयक धोरण, आंतरराष्ट्रीय व्यापारांत स्थैर्य राखण्याच्या दृष्टीनें आंखण्याचे प्रयत्न चालू आहेत. फेब्रुवारी अखेर पर्यंत आंतरराष्ट्रीय चलननिधीनें सदस्य राष्ट्रांना ७० कोटी डॉलर्सची रकम व्यापारी देणीं भागविण्यासाठीं उपलब्ध करून दिली, व त्यापैकीं हिंदच्या वाट्यास सुमारें ९ कोटी डॉलर्सची रक्कम आली. या मदतीमुळें हिंदला परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल तफावत भरून काढतां आली.

### दि बॅंक ऑफ कराड लि.

१९४८ मध्यें वरील बॅंकेचें खेळतें भांडवल १८½ लक्ष रुपयांवर गेलें व तिनें २२,०५५ रु. निवळ नफा मिळविला. ४% करमाफ डिव्हिडंडसाठीं ७,००० रुपयांचा विनियोग करण्यांत आला, आणि ५ हजार रु. रिझर्व्ह फंड, ५ हजार रु. इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन रिझर्व्ह, २ हजार रु. जनरल रिझर्व्ह, अशा रकमा टाकण्यांत आल्या. बॅंकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. विष्णुपंत शिराळकर ह्यांनीं आपल्या वेतनांचा २,००० रु. चा हक्क सोडून दिल्याबद्दल डायरेक्टरांनीं त्यांचे आभार मानले आहेत. बॅंकेनें म. गांधी स्मारक निधीस १,००१ रु. दिले. बॅंकेच्या एकूण खेळत्या भांडवलापैकीं ९½ लक्ष रु. रोख बॅंकांत व रोख्यांत असून ८½ लक्ष रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. बॅंकेनें अल्पावधींत चांगली प्रगति केली आहे. ( चेअरमनः श्री. ल. म. देशपांडे; मॅ. डायरेक्टरः श्री. वि. द. शिराळकर; मॅनेजरः श्री. म. वि. खंडकर )

### दि युनियन बॅंक ऑफ कोल्हापूर लि.

१९४८ सालीं वरील बॅंकेस ४६ हजार रुपये निवळ नफा झाला. १० हजार रु. रिझर्व्ह फंड, २ हजार रु. बॅड डेट व कॉन्टिजन्सी फंड, २ हजार रु. इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंड, २८७२ रु. प्रॉपर्टी डि. फंड, ह्याप्रमाणें वेगवेगळ्या फंडांत रकमा टाकून ११,७४२ रुपयांचा विनियोग ९ टक्के प्रमाणें इन्कम टॅक्स वजा करून डिव्हिडंड वाटण्याकडे करण्यांत आला. बॅंकेच्या २६ लक्ष रुपये खेळत्या भांडवलापैकीं २ लक्ष ४ हजार रुपये तिचे स्वतःचे ( वसूल भांडवल व रिझर्व्हज ) आहेत. बॅंकेनें १२½ लक्ष रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. बॅंक बिल्डिंगची खरेदी किंमत १ लक्ष, ३ हजार रु. आहे. बॅंकेचा व्यवहार किफायतशीर चालू आहे. अहवालाच्या सालीं अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं पूर्ण दक्षता घेऊन व्यापाऱ्यांना शक्य त्या सवलती देऊन आपलें काम केलें आहे. श्री. चुनीलाल ऊर्फ बाबूभाई मार्शिंगजी परमार, सराफ अँड बॅंकर, हे बॅंकेचे चेअरमन असून श्री. गो. ग. श्रीखंडे हे मॅ. डायरेक्टर आहेत.

**पाकिस्तानमधील हॉटेल्स**—कराचीं शहरांतील हॉटेलसमधून जेवण्याचे व रहाण्याचे सध्याचे जे दर आहेत, त्यांवर नियंत्रण घालण्याचा विचार पाकिस्तान सरकार करीत आहे.

## बँक ऑफ पूना लि.

**– शेड्यूल्ड बँक –**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | २५,००,००० |
| वसूल भांडवल | १२,५०,००० |

**संचालक मंडळ**

१ शेठ मुरलीधर चतुर्भुज ठोया–चेअरमन, २ शेठ डी. आर. नाईक, जे. पी. (व्हा. चेअरमन), ३ डॉ. ना. भि. परुळेकर, एम. ए., पीएच. डी., संचालक–सकाळ, ४ शेठ फ्रामजी पी. पोचा, ५ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी (सोलापूर), ६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी, ७ शेठ गणपतराव काळूराम नाईक, बी. एससी., बी.ई.,एलएल. बी.

**मुख्य ऑफिस–४५५, रविवार, पुणें**

शाखाः—(१) भवानी पेठ, (२) सदाशिव पेठ, पुणें २, (३) सोलापूर, (४) सांगली.

हिंदुस्थानांतील प्रमुख शहरांवर ड्राफ्टस् व हुंड्या दिल्या जातात.

आपल्याजवळच्या पैशाचा योग्य मोबदला या बँकेच्या निरनिराळ्या योजनेनें घ्या. सेफ डिपॉझिट लॉकरची सोय.

विशेष माहितीकरितां लिहा—

गो. ग. साठे, ए. बी. आय. (लंडन), मॅनेजर



## दि सांगली स्टेट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

**(स्थापना सन १९२७)**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार

या बँकेमार्फत केले जातात.

**ना. पां. ठाणेदार**

मॅनेजर



**बेडेकर लोणची** वापरा



## दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.

हेड ऑफिसः—१११।११२ सदाशिव पेठ, सातारा

शाखाः—औन्ध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड वगैरे

★ ठिकाणांवर ड्राफ्टस् दिले जातात.

**बचतीच्या आकर्षक योजना**

★ मुदत ठेवी आकर्षक दरानें १ ते ५ वर्षे पर्यंत स्वीकारल्या जातात.

★ सेव्हिंग बँकेंत रु. १५,०००/– पर्यंत ठेव ठेवतां येते. खात्यांतून आठवड्यांतून दोनदा चेकनें रकमा काढतां येतात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

## ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तु, इत्यादीसाठीं चौकशी कराः—

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

**औद्योगिक सहकारावील आमचीं प्रकाशनें**

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज
(लेः—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)

(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
(लेः—जे. बी. टेलर, किं. १ रु.)

(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट
(लेः—. रॅवि ॲले, किं. २ रु.)


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.